**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या अमरावती जिल्हयातील २० रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. ०८.०९.२०२५ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दुपारी १.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडून अमरावती जिल्हयातील २० रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०८.०९.२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-63 of 2025 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-250821-FTS-0204 दि. २१.०८.२०२५ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्री अनिल भटकर, उपजिल्हादंडाधिकारी, अमरावती — अध्यक्ष
२. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्रीमती धनश्री गो. पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१ — समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. ०८.०८.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०८.०९.२०२५ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा उपजिल्हाधिकारी मा. श्री अनिल भटकर यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समीतीचे समन्वयक यांचे वतीने श्री जितेंद्र पुरते, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अमरावती जिल्हयातील २० रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अमरावती यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील

नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई- ४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०६
३. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती-४४४६०६.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती/ जिल्हा परिषद, अमरावती/ जिल्हा उदयोग केंद्र, अमरावती
५. उप-विभागीय कार्यालय — मोर्शी/भातकुली/तिवसा/अचलपूर/ धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.
६. तहसिल कार्यालय - मोर्शी/भातकुली/तिवसा/अचलपूर/ धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.
७. कार्यकारी अधिकारी, नगर पंचायत- भातकुली, जि. अमरावती.
८. ग्रामपंचायत कार्यालय- राजुरवाडी, ता. मोर्शी, जि. अमरावती, जवरा (फ)/फत्तेपुर /भारवाडी / उबंरखेड/ धमंत्री, ता. तिवसा, जि. अमरावती, वाढोडा शुक्लेश्वर/ सोनारखेडा/भालसी/ धनगरखेडा/पुर्णानगर, ता. भातकुली, जि. अमरावती, शहापुर - सावली (बु)/येसुर्णा- निंभारी ता. अचलपूर, जि. अमरावती बोरगांव निस्ताने/गोकुळसारा/ दिधीमहल्ले, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.

श्री जितेंद्र पुरते, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री जितेंद्र पुरते, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास ईमेल स्वरूपात एक सुचना/आक्षेप प्राप्त झालेली आहे. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना काही प्रश्न अथवा सुचना असल्यास मांडण्याबाबत सुचित केले.

मो. नवेद मो. हनीफ, रा. दर्यापूर, ता. दर्यापूर यांनी विचारणा केली की, नदीमधुन रेती काढल्यानंतर रेती वाहून नेण्याकरीता फक्त ट्रॅक्टर लाच परवानगी आहे काय, टिप्परला परवानगी का नाही. याबाबत प्रतिनिधी, एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी सांगीतले की, शासनाच्या धोरणानुसार नदीपात्रामधे ट्रॅक्टर शिवाय इतर मोठी वाहने नेण्यास परवानगी नाही.

श्री देवेंद्र बापट यांनी सदर प्रक्रिया ही रेती डेपो ची आहे की रेती लिलावाची अशी विचारणा केली. याबाबत प्रतिनिधी, एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी सांगीतले की, ही प्रक्रिया ही रेतीच्या लिलावाची आहे.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (धनश्री गो. पाटील) | (सं. दे. पाटील) | (अनिल भटकर) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष, लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप- प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती |
| म.प्र.नि.मंडळ, अमरावती-१ | म.प्र.नि.मंडळ, अमरावती | |